पोलीस [illegible] यांना साप्ताहिक
सुट्टीच्या मोबदल्यात देण्यात येणा-या रकमेत
वाढ होणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन निर्णय क्र. सीएए ०३९२/सीआर-१८/पोल- ५ अ
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक- [illegible] जून, १९९२.

वाचा- १] शासन निर्णय, गृह विभाग क्र. एलव्हीई ०१७९/१३५४/पीओएल-५ दिनांक १६. ६. ७९.

२] शासन निर्णय, गृह विभाग क्र. एलव्हीई ०१८४/१२२४/पीओएल-५ बी दिनांक १५. १०. १९८८.

३] पोलीस महासंचालकांचे क्र. १६/९०७९/दिनांक २२ फेब्रुवारी १९९२ चे पत्र.

पोलीस विभागातील पोलीस निरीक्षक या हुद्यापर्यंतचे पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना साप्ताहिक सुट्टीच्या मोबदल्यात देण्यात येणा-या दैनिक भत्त्याच्या रकमे मध्ये त्यांच्या वेतन मर्यादेनुसार खालीलप्रमाणे वाढ करण्यास शासन मंजूरी देत आहे.

वेतनमर्यादा	दैनिकभत्ता [रुपये]
रू. २८००-३२००	रू. ७०/-
रू. १९००-२७९९	रू. ६०/-
रू. १४००-१८९९	रू. ५३/-
रू. १४०० पेक्षा कमी	रू. ४५/-

हे सुधारित दर दिनांक १. ४. ९२ पासून अमंलात येतील. या करिता येणारा खर्च "२०५५-पोलीस-ओडीसी" या लेखाशिर्षाखाली मंजूर केलेल्या अनुदानातूनच भागविण्यात यावा. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ७५७/९२ व्यय-७ दिनांक १३. ४. १९९२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[illegible]

[नु. अ. मुल्ला]

उप सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

प्रति,

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, लाललुचपत प्रतिबंधक केंद्र व विशेष पोलीस महानिरीक्षक मुंबई.
सर्व पोलीस उपमहानिरीक्षक, सर्व पोलीस आयुक्त,
सर्व पोलीस अधिक्षक [लोहमार्गसहित]
सर्व सम[illegible] राज्य राखीव पोलीस बल
महालेखापाल/[लेखापरिक्षा]/मुंबई /नागपूर.
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता] मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई